01 OCT 2026

आरडंट व्यू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर विमानतळावर राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे स्वागत

कोल्हापूर : राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे आज सकाळी १० वा. कोल्हापूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांचे प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी स्वागत केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजनिश कामत, कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, वारणा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, करवीर उपविभागीय अधिकारी मौसमी चौगुले उपस्थित होते. विमानतळावर आगमन होताच राज्यपालांना पोलीस दलाच्या वतीने गार्ड ऑफ ऑनर (सलामी) देऊन मानवंदना देण्यात आली.



01 OCT 2026

वर्तमान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या ब्रँडिंगसाठी कोल्हापूर महोत्सवासारखे उपक्रम राबवा : राज्यपाल




कोल्हापूर/प्रतिनिधी :

कोल्हापूर जिल्हा अप्रतिम निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे, विपुल निसर्ग संपदा लाभलेली आहे, जिल्ह्याला धार्मिक तीर्थस्थळे, क्रीडा, व्यापार, उद्योग यांची गौरवी परंपरा आहे. कोल्हापूरचे समग्र, एकात्मिक ब्रॅण्डिंग करण्यासाठी कोल्हापूर महोत्सवासारखे उपक्रम राबवावेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा हे कोल्हापूर दौऱ्यावर असताना त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील प्रमुख विकास प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड डॉ.कुलगुरू राजनिश कामत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जासमिन, राज्यपालांचे परिसहायक नवदीप अगरवाल, इचलकरंजी महानगरपालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, कोल्हापूरला फार मोठी गौरवी परंपरा लाभलेली आहे. येथील कुस्ती, कबड्डी, सारखे खेळ प्रसिद्ध आहेत. येथील वने समृद्ध आहेत. निसर्ग सौंदर्याने हा जिल्हा नटलेला आहे. इचलकरंजीचा कापड उद्योग, हुपरीचा चांदी उद्योग सातासमुद्रापार पोहोचलेला आहे. या ठिकाणी श्री अंबाबाई, श्री जोतिबा यासारखी तीर्थस्थळे आहेत. कोल्हापुरी गुळ, कोल्हापुरी चप्पल यासह अनेक कृषी उत्पादने, हस्तकलांचा मोठा लौकिक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कोल्हापूरला जागतिक नकाशावर प्रमोट करण्यासाठी त्याचे ब्रॅण्डिंग आवश्यक आहे त्या दृष्टीने कोल्हापूर महोत्सवासारखे महोत्सव अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतील. त्यासाठी विमानतळाची कनेक्टिव्हिटी अधिक वाढली पाहिजे.

सुदृढ समाज आणि निकोप समाजमन घडविण्यासाठी नशा मुक्त भारत आणि टीबी मुक्त भारत ही अभियाने प्रशासनाने अत्यंत व्यापकपणे राबवावीत, असे सांगून राज्यपाल वर्मा म्हणाले, व्यसनमुक्ती केवळ कायदे, पोलीस प्रशासन अथवा शासकीय उपाययोजनांपुरती मर्यादित नसून, निरोगी आणि व्यसनमुक्त समाज घडवण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा, कुटुंबाचा आणि समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. नशा मुक्त पिढी घडविणे हे आज फार मोठे आव्हान आहे. नशा मुक्तीला समाजातूनच नकार निर्माण झाला पाहिजे, समाजातील खेळाडू, कलाकार, प्रभावी व्यक्तिमत्वे यांनीही या कार्यात पुढे येऊन जनजागृती व प्रबोधनासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्ह्यात राबविण्यात येत असणाऱ्या महत्त्वाच्या प्रकल्पांचे सादरीकरण जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी केले. महापालिकेतर्फे डॉ.राजेंद्र भारूड यांनी केले. तर जिल्हा परिषदेतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.जासमिन यांनी केले. यामध्ये महामार्ग विकास, राज्यस्तरीय रस्ते विकास, विमानतळ विस्तार, सांस्कृतिक वारसा आणि तीर्थक्षेत्र विकास, श्री महालक्ष्मी अंबाबाई विकास आराखडा, श्री क्षेत्र जोतिबा विकास आराखडा, शिक्षण, संशोधन आणि प्रशासन यामधील विविध उपक्रम, वैद्यकीय पायाभूत सुविधा, पुर नियंत्रण आणि प्रदूषण मुक्तीसाठीचे प्रकल्प, प्रस्तावित कोल्हापूर आयटी पार्क, पवणार ते पत्रादेवी महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग, विभागीय क्रीडा संकुल आधुनिकीकरण आणि विस्तार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, रिंग रोड व चार पदरी उन्नत मार्गीका, वैभववाडी- कोल्हापूर रेल्वे मार्ग प्रकल्प आदी विषयांबाबतचे सादरीकरण जिल्हाधिकारी यांनी केले.

संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृह, राजर्षी शाहू खासबाग मैदान, राजर्षी शाहू महाराज समाधी स्थळ, मेकॅनिकल कार पार्किंग, रंकाळा म्युझिकल फाउंटन, अॅस्ट्रो टर्फ हॉकी स्टेडियम, श्री अंबाबाई मंदिर पार्किंग आणि भक्तनिवास यासह शहराच्या विविध सौंदर्यकरणाचे उपक्रम, कोल्हापूर इलेव्हेटर कॉरिडॉर, घनकचरा व्यवस्थापन आणि प्रक्रिया प्रकल्प, जीआयएसबेस्ड मालमत्ता सर्वे आदी विषयांबाबतचे सादरीकरण महापालिका आयुक्त यांनी केले. प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील जिल्हा परिषदेचे विविध उपक्रम, पिजीआय ग्रेडिंग, समृद्ध शाळा पिंक रूम उपक्रम याबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादरीकरण केले.

यावेळी राज्यपाल वर्मा यांनी पिंक रूम उपक्रमाचे कौतुक करून याची गरज व महत्त्व अधोरेखित केले. तसेच आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यात उभी करण्यात आलेली ट्रान्सजेंडर यांची रेस्क्यू टीम या संकल्पनेचेही राज्यपाल महोदयांनी कौतुक केले.

0 1 OCT 2026

आरडर न्यूज

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात कार्यक्रम होईल. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित केला आहे.

विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. राजनिश कामत अध्यक्षस्थानी असतील.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' युट्यूब वाहिनीवरुन 'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली.

या मालिकेतील स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. नव्या पिढीला स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. अरुण भोसले, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अविनाश पाटील तसेच कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. इतिहास, स्वातंत्र्य चळवळ विषयांत रस असलेल्या नागरिकांनी, विद्यार्थी, संशोधक आणि विद्यापीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

01 OCT 2026

जनप्रवास

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जयसिंगपूर येथे शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात

## विवेकानंद कॉलेजला सांघिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतेपद फिरता चषक, शहाजी लॉ कॉलेजला वैयक्तिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतेपद फिरता चषक : १५ कला प्रकारांचे सादरीकरणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला

**जनप्रवास : जयसिंगपूर**

येथील जयसिंगपूर कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाचा कोल्हापूर विद्यार्थी विकास विभागाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२६ हा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून संपन्न झाला. यामध्ये १५ कला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले.

**युवा महोत्सवाच्या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे**

मराठी वक्तृत्व :-प्रथम शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय कमला कॉलेज कोल्हापूर व तृतीय डॉ. डी वाय पाटील प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर,

हिंदी वक्तृत्व :-प्रथम शहाजी लॉ कॉलेज ऑफ कोल्हापूर, द्वितीय विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, तृतीय डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज,

इंग्रजी वक्तृत्व :- प्रथम शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय डॉ. डी वाय पाटील प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, तृतीय डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,

वादविवाद :- प्रथम श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी, द्वितीय शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, तृतीय डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोल्हापूर,



जयसिंगपूर : येथे युवा महोत्सवात लोकनृत्य कला प्रकारात प्रथम स्थान टकावलेले लोक नृत्य : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

प्रश्नमंजुषा :- प्रथम

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोल्हापूर, तृतीय शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर,

सुगम गायन :- प्रथम शिवराज कॉलेज ऑफर्स कॉमर्स अँड डी एस कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज, द्वितीय क्रमांक साधना कॉलेज ऑफ कॉमर्स गडहिंग्लज, तृतीय आर. बी. माडखोलकर महाविद्यालय चंदगड,

भारतीय समूहगीत :- प्रथम विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, तृतीय शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर,

एकपात्री अभिनय :- प्रथम शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय विवेकानंद कॉलेज कोल्हापूर,

पथनाट्य :- प्रथम सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय डॉ.डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोल्हापूर, तृतीय विवेकानंद कॉलेज कोल्हापूर,

मूकनाट्य :- प्रथम डी.वाय.पाटील टेकनिकल कॅम्पस, फॅकल्टी ऑफ इंजीनियरिंग, फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट, तळसंदे, द्वितीय सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड, तृतीय विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर,

प्रहसिका :- प्रथम राजाराम कॉलेज कोल्हापूर, द्वितीय भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोल्हापूर, तृतीय द न्यू कॉलेज कोल्हापूर,

एकांकिका :- प्रथम न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर,

लोककला :- प्रथम विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, तृतीय डी.आर.माने आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कागल,

लोकनृत्य :- प्रथम दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, द्वितीय श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2026

सकाळ

# उत्तम आवाजासाठी योग, प्राणायाम आवश्यक : दैनी

**कोल्हापूर :** आवाजाची सुरुवात श्वसनापासून होते. आवाज हा व्यक्तिमत्त्वाचा आरसा असून त्याचा पोत उत्तम ठेवण्यासाठी नियमित योग व प्राणायाम आवश्यक आहेत, असे मत व्हॉईस आर्टिस्ट, लेखक भरत दैनी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभाग व विंडो फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने मास कम्युनिकेशन विभागात व्हॉईस ॲक्टिंग कार्यशाळा झाली. यावेळी दैनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

दैनी म्हणाले, आवाज हे केवळ संभाषणाचे माध्यम नसून विचार, भावना व अनुभव व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे. आवाजावर प्रभुत्व मिळवण्यासाठी नियमित सराव आवश्यक आहे. या क्षेत्रात व्यवसायाच्या अनेक संधी असून विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रयत्न करावेत. प्रत्येक आवाजाची भाषिक वैशिष्ट्ये समजून घेण्याबरोबरच आवाजात भावनिक प्रामाणिकपणा असणे महत्त्वाचे आहे.



## स्टुडिओत आवाजाचे प्रॅक्टिकल!

भरत दैनी यांनी विद्यापीठाच्या रेडिओ स्टुडिओमध्ये विद्यार्थ्यांना आवाजाचे विविध पैलू प्रात्यक्षिकातून समजावून सांगितले. आवाज रेकॉर्ड करून त्यातील बारकावे स्पष्ट केले. माईकसमोर बोलताना घ्यावयाची काळजी आणि आवाजातील टोनचा परिणाम याचे प्रात्यक्षिकही त्यांनी दाखविले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2026
जनप्रवास

# उत्तम आवाजासाठी योग, प्राणायाम आवश्यक

## लेखक दैनी यांचे मत

**जनप्रवास : कोल्हापूर**

आवाजाची सुरुवात श्वसनापासून होत असते. आवाज हा व्यक्तिमत्त्वाचा आरसा असून त्याचा पोत उत्तम असायला हवा. यासाठी नियमित योग आणि प्राणायाम आवश्यक असल्याचे मत व्हॉईस आर्टिस्ट, लेखक भरत दैनी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडो फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने मास कम्युनिकेशन विभागात व्हॉईस ॲक्टिंग कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.



**शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागामध्ये आयोजित व्हॉइस एक्टिंग कार्यशाळेत बोलताना भरत दैनी.**

दैनी म्हणाले, आवाज हे फक्त संभाषणाचे माध्यम नाही, तर तो विचार, भावना आणि अनुभव व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे. आवाजावर प्रभुत्व मिळवण्यासाठी योग व प्राणायाम महत्त्वाचे असून नियमित सराव आवश्यक आहे. या क्षेत्रात व्यवसायाच्या अनेक संधी आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत; तरच या क्षेत्रात टिकून राहता येईल. प्रत्येक आवाजाची काही भाषिक वैशिष्ट्ये असतात. ती समजून घेणे आवश्यक असून आवाजामध्ये भावनिक प्रामाणिकपणा असणे महत्त्वाचे आहे, असेही दैनी यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षस्थानावरून डॉ. विलास शिंदे म्हणाले, आवाजात टोन महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक ठिकाणी आवाजाचे वेगळे महत्त्व आहे, ते आपण जाणून घेतले पाहिजे. कोणती माहिती शांतपणे आणि कोणती माहिती आक्रमकपणे द्यायला हवी याची जाण असणे आवश्यक आहे आणि यासाठी आवाज खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतो.

मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख अभिनव गुरव व खुशिया त्र्यंबके यांनी करून दिली. सूत्रसंचालन सायली गणेशकर यांनी केले. आभार रितेश कोलभ यांनी मानले. यावेळी विंडो फिल्म प्रोडक्शनचे संचालक चंद्रशेखर गुरव, चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडिया, हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, दादू संकपाळ, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात एआयवर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, कौशल्य विकास विभाग आणि इझी लर्निंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणशास्त्र सभागृहात 'कृत्रिम बुद्धिमत्ता" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेत सध्याच्या डिजिटल युगात आणि शिक्षण क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचे महत्त्व, त्याची विविध अंगे व दैनंदिन जीवनातील व्यावहारिक उपयोग याविषयी तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शरद बनसोडे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार मारूलकर, कौशल्य विकास अधिकारी ईश्वर पुजारी उपस्थित होते. यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. रवींद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2026
सकाळ

# 'कृत्रिम बुद्धिमत्ते'बाबतच्या कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, कौशल्य विकास विभाग आणि इझी लर्निंग इन्स्टिट्यूटतर्फे शिक्षणशास्त्र सभागृहात 'कृत्रिम बुद्धिमंत्ता' यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. डिजिटल युगात आणि शिक्षण क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचे महत्त्व, त्याची विविध अंगे व दैनंदिन जीवनातील व्यावहारिक उपयोगाविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करावा, याची 'इझी'चे नीलेश जैन यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार अध्यक्षस्थानी होते. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. केदार मारुलकर, ईश्वर पुजारी उपस्थित होते. यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक केले. रवींद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले.

01 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात विविध कलांचा जागर

## शिवाजी विद्यापीठातर्फे जयसिंगपूरमध्ये आयोजन

जयसिंगपूर, ता. ३० : जयसिंगपूर कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर विद्यार्थी विकास विभागातर्फे जिल्हास्तरीय युवा महोत्सव झाला. महोत्सवात १५ कला प्रकारांचे सादरीकरण झाले. विविध कला प्रकारांचे निकाल रात्री उशिरा जाहीर केले.

स्पर्धेतील अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक विजेते असे : मराठी वक्तृत्व : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर; कमला कॉलेज, कोल्हापूर; डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर. हिंदी वक्तृत्व : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर; विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर; डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज. इंग्रजी वक्तृत्व : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर; डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर; डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर.



जयसिंगपूर : इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या लोकनृत्य संघाने प्रथम क्रमांक मिळवला.

वादविवाद : श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी; शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर; डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर. प्रश्नमंजुषा : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर; डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर; शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर. सुगम गायन : शिवराज कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज; साधना कॉलेज ऑफ कॉमर्स, गडहिंग्लज; आर. बी. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड. भारतीय समूहगीत : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर; सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर. एकपात्री अभिनय : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर; देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर; विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. पथनाट्य : सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर; विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. मूकनाट्य : डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस, फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग, फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट, तळसंदे; सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड; विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. प्रहसिका : राजाराम कॉलेज, कोल्हापूर; भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर; द न्यू कॉलेज, कोल्हापूर. एकांकिका : न्यू कॉलेज, कोल्हापूर; विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर; देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर. लोककला : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर; श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी; डी. आर. माने आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कागल. लोकनृत्य : दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी; श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी; सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# विवेकानंद कॉलेज सांघिक, शहाजी लॉ वैयक्तिकमध्ये विजेते

## जयसिंगपूर कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**जयसिंगपूर :** जयसिंगपूर कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर सांघिक गटात विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने विजेतेपद पटकावले, तर वैयक्तिक प्रकारात शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूरने बाजी मारत फिरता चषक पटकावला. रंगतदार ठरलेल्या या महोत्सवात एकूण १५ विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. तरुण कलाकारांच्या कलागुणांनी हा युवा महोत्सव विशेष गाजला.



लोकनृत्य कला प्रकारात दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजीने प्रथम क्रमांक पटकावला.

**स्पर्धेतील विजेते अनुक्रमे असे :**

१) **वक्तृत्व मराठी -** शहाजी लॉ कॉलेज , कमला कॉलेज कोल्हापूर व डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, न्यू कॉलेज कोल्हापूर व शिवराज कॉलेज , गडहिंग्लज. २) **हिंदी -** शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, तृतीय डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी व डॉ. डी. वाय. पाटील, कोल्हापूर. ३) **इंग्रजी -** शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय, तृतीय डॉ. डी. वाय. पाटील , कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर व आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, गडहिंग्लज. ४) **वादविवाद -** श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व जयसिंगपूर कॉलेज. ५) **प्रश्नमंजुषा -** विवेकानंद , कोल्हापूर, डी. वाय. पाटील कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज. ६) **सुगम गायन -** शिवराज कॉलेज गडहिंग्लज, साधना कॉलेज गडहिंग्लज, आर. बी. माडखोलकर महाविद्यालय चंदगड, डॉ. डी. वाय. पाटील , कोल्हापूर व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर. ७) **भारतीय समूहगीत -** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. ८) **एकपात्री अभिनय -** शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील कोल्हापूर व न्यू कॉलेज ९) **पथनाट्य -** सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, डॉ. डी. वाय. पाटील कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर व कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी. १०) **मूकनाट्य -** डी.वाय.पाटील तळसंदे, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, जयसिंगपूर कॉलेज, व भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर.